**नव्याने स्थापन केलेल्या नगरपालिका/ नगरपंचायतीसाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नियुक्तीबाबत.**

नगरपरिषद प्रशासन संचालनालय
शासकिय परिवहन सेवा इमारत, ३ रा मजला,
सर पोचखानवाला मार्ग, वरळी,
मुंबई ४०० ०३०.
नपप्रस/PMC/empanelment/प्र.क्र. १११/२०१८/क.१३/९१८
दिनांक :- २७ मार्च, २०१८

संदर्भ :- १) नगरपरिषद प्रशासन संचालनालय निविदा क्र.DMA/Desk१३/PR८३ दि २० जुन, २०१७
२) नगरपरिषद प्रशासन संचालनालय नपप्रसं-२०१७/empanelment/PMC/ कक्ष -१३/४९००, दि २५ऑक्टोंबर, २०१७
३) नगर विकास विभाग नवि-१६ यांचेकडील पत्र क्र. संकिर्ण -२०१६/ प्र.क्र.१८६/नवि-१६ दि. १५.०१.२०१८.
४) नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांचेकडील नपप्रसं-२०१७/empanelment/PMC/ प्र.क्र.१११/२०१८ कक्ष १३ दि २५जानेवारी, २०१८
५) नपप्रस/PMC/empanelment/प्र.क्र. १११/२०१८/क.१३/२७७ दिनांक :- ३१ जानेवारी, २०१८

## आदेश

उपरोक्त संदर्भाधीन क्र. १ नुसार नगर परिषद प्रशासन संचालनालय यांनी नव्याने स्थापन केलेल्या नगर पालिका/ नगर पंयायतीमध्ये प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांची निश्चिती करणे बाबत निविदा बोलावण्यात आली होती. तांत्रिक प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांना यादीबध्द करणेस व त्याचे समवेत करावयाच्या करारनाम्याच्या मसुद्यास शासनाची मान्यता घेणे बाबतचा प्रस्ताव शासनास उपरोक्त नमुद अनुक्रमांक २ वरील संदर्भ पत्रान्वये सादर केला होता. त्यास शासनाने संदर्भातील अनुक्रमांक ३ वरील पत्रान्वये मान्यता प्रदान केली आहे.

त्यास अनुसरुन या निविदा प्रक्रियेत पात्र ठरलेल्या १२ निविदा धारकांसोबत करारनामा करण्याच्या दृष्टीने संदर्भातील अनुक्रमांक ४ वरील पत्रान्वये करारनामा करण्याच्या सूचना संबंधित पात्र १२ निविदा धारकांना देण्यात आल्या आहेत. संदर्भातील अनुक्रमांक ५ वरील आदेशान्वये ७ पात्र निविदा धारकांबरोबर करारनामे करण्यात आले. उर्वरित ५ पात्र निविदा धारकापैकी खालील प्रमाणे २ पात्र निविदा धारकांचेच करारनामे संचालनालयाकडे प्राप्त झाले आहेत.

| | |
|---|---|
| 1) Mr. Shashank Paradkar. SGI Studio Galli Ingegneria India Pvt Ltd, Panama house,6floor, S.No.204-206 Viman nagar, Pune-411 004. | |
| 2) Mr. S.V.Kolhekar KICONS Ltd, 1 Namdhan,Lane No.5, Prabhat Road, Deccan Gymkhana, Pune-411 004. | |

तरी वरील २ निविदा धारकांची नव्याने स्थापन झालेल्या नगर परिषदा व नगर पंचायतींसाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) पॅनलवर नियुक्ती ३ वर्षाकरिता करण्यात येत आहे. असे एकूण ९ पात्र निविदाधारकांचे करारनामे संचालनालयातर्फे आजपर्यंत करण्यात आले आहेत. सदर प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) यांना करारनाम्यातील तरतुदीप्रमाणे काम करणे बंधन कारक राहील.

(विरेन्द्र सिंह)
आयुक्त तथा संचालक
नगरपरिषद प्रशासन संचालनालय

प्रति

१. मा. प्रधान सचिव, नगर विकास विभाग (नवि-२), मुंबई -३२
२. मा. विभागीय आयुक्त (सर्व)
३. जिल्हाधिकारी, (सर्व)
४. मुख्याधिकारी, नव्याने स्थापन नगरपरिषदा व नगर पंचायती
५. निवड नस्ती कार्या.१३